# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः21.09.2025** **वारःरविवार**

---

विकसित भारताच्या उभारणीसाठी आत्मनिर्भरतेचा संकल्प अत्यावश्यक असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन

पुढच्या वर्षी मार्चपर्यंत देशातून नक्षलवाद पूर्णपणे संपुष्टात येईल - केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचा पुनरुच्चार

अमेरिकेच्या एच-१बी व्हिसाचे शुल्क नवीन अर्जदारांनाच लागू – व्हाईट हाऊसचं स्पष्टीकरण; भारताकडून परिणामांचा अभ्यास सुरू

२०२३साठीचा दादासाहेब फाळके पुरस्कार ज्येष्ठ मल्याळी अभिनेते मोहनलाल यांना जाहीर

आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत सुपर फोर गटात आज भारत-पाकिस्तान यांच्यात लढत

आणि

चायना मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत सात्विक साईराज आणि चिराग शेट्टी पुरुष दुहेरीच्या अंतिम फेरीत

**<u>पंतप्रधान</u>**

परदेशी वस्तूंवरील अवलंबित्व हे आपल्या पुढचं मोठं आव्हान असून त्यावर मात करण्यासाठी आत्मनिर्भर भारत संकल्पनेचा अंगीकार अत्यंत आवश्यक असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. सेमीकंडक्टर चिप्सपासून जहाजांपर्यंत सर्व क्षेत्रांमध्ये देशांतर्गत उत्पादनाचं महत्त्व त्यांनी अधोरेखित केलं. गुजरातमधल्या भावनगरमध्ये समुद्र से समृद्धी तक या कार्यक्रमात ते काल बोलत होते. यावेळी त्यांनी ३२ हजार कोटी रुपयांच्या विविध प्रकल्पांची पायाभरणी आणि लोकार्पण केलं. त्यात मुंबईतल्या आंतरराष्ट्रीय क्रूज टर्मिनलच्या उद्घाटनाचाही समावेश आहे. सव्वा ४ लाख वर्गफूट क्षेत्रफळावरं उभं राहिलेलं हे देशातलं सर्वात मोठं क्रुझ टर्मिनल आहे.

२०४७पर्यंत विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी आत्मनिर्भरतेचा अंगिकार अत्यंत आवश्यक आहे, असं पंतप्रधान म्हणाले. भारताला सागरी महासत्ता बनवण्यासाठी केंद्र सरकार कटिबद्ध आहे; त्यासाठी २०४७पर्यंत जागतिक सागरी व्यापारात आपला वाटा तिप्पट करण्याचं उद्दिष्ट आहे, असं पंतप्रधान म्हणाले.

**<u>चित्रपट</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५व्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रीय पुरस्कार विजेता "चलो जीते हैं" चित्रपट आज देशातील अनेक शाळांमध्ये आणि सुमारे ५०० चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित केला जात आहे. हा चित्रपट पंतप्रधान मोदींच्या आयुष्यातील बालपणीच्या घटनांवर आधारित आहे. ज्यामध्ये ते स्वामी विवेकानंदांच्या तत्वज्ञानाने प्रभावित होऊन आपल्या सभोवतालच्या छोट्या जगात बदल घडवून आणण्याचा प्रयत्न करतात.

**राजनाथ सिंह**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आज मोरोक्कोच्या दौऱ्यावर जात आहेत. हा उत्तर आफ्रिकी राष्ट्राचा रक्षामंत्र्यांचा पहिलाच दौरा असेल. या दौऱ्यात मोरोक्कोचे संरक्षण मंत्री अब्देलतिफ लौदीयी यांच्यासोबत संरक्षण, धोरणात्मक आणि उद्योग सहकार्य मजबूत करण्यासाठी द्विपक्षीय बैठक होणार आहे. तसंच बेरेचिड इथं टाटा ॲडव्हान्स्ड सिस्टम्स मोरोक्कोच्या व्हीलड आर्मर्ड प्लॅटफॉर्मसाठीच्या नवीन उत्पादन प्रकल्पाच्या उद्घाटन कार्यक्रमालाही राजनाथ सिंह उपस्थित राहणार आहेत. आफ्रिकेतील हा पहिलाच भारतीय संरक्षण उत्पादन संयंत्र प्रकल्प असून आत्मनिर्भर भारत उपक्रमांतर्गत भारताच्या संरक्षण उद्योगाच्या जागतिक स्तरावरील पदचिन्ह प्रतिबिंबित करणारा एक महत्त्वाचा टप्पा आहे,असं सिंह यांनी समाजमध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. भारत आणि मोरोक्को यांच्यात या दौऱ्यात संरक्षण क्षेत्रातील सहकार्यासाठी सामंजस्य करारावर स्वाक्षरी होणार असून त्यामुळे द्विपक्षीय संरक्षण संबंधांचा विस्तार करण्यासाठी मदत होणार असून यामध्ये देवाणघेवाण, प्रशिक्षण आणि औद्योगिक संबंध यांचा समावेश असेल.तसंच या दौऱ्यात रबाटमधील भारतीय समुदायाशी राजनाथ सिंह संवाद साधणार आहेत.

**अमितशहा**

पुढच्या वर्षी मार्चपर्यंत देशातून नक्षलवाद पूर्णपणे संपुष्टात येईल असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. ते काल एका खाजगी दूरचित्रवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत बोलत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या प्रयत्नांमुळे गेल्या दशकात इशान्येकडील राज्य आणि अन्य नक्षलग्रस्त भागांतील हिंसाचाराच्या घटनांमध्ये ७५ टक्क्यांनी घट झाली आहे, असं त्यांनी सांगितलं. केंद्र सरकारनं ११ वर्षांपेक्षा कमी कालावधीत सुमारे ६० कोटी लोकांना घरं, वीज, शौचालयं, गॅस जोडणी, पिण्याचं पाणी आणि आरोग्य कवच दिलं असल्याचं अमित शहा यांनी सांगितलं.

**अश्विनीवैष्णव**

महत्वाकांक्षी अहमदाबाद-मुंबई बुलेट ट्रेनचा सूरत ते बिलिमोरा हा पहिला टप्पा २०२७मध्ये सुरू होईल, अशी माहिती रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल दिली. या प्रकल्पाचा ठाण्यापर्यंतचा टप्पा २०२८पर्यंत, तर वांद्रे-कुर्ला संकुलापर्यंतचा भाग त्याच्यापुढच्या वर्षी पूर्ण होईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. बुलेट ट्रेन मार्गावरच्या घणसोली ते शीळफाटा या दरम्यानच्या ५ किलोमीटरच्या बोगद्याचं जोडकाम अश्विनी वैष्णव यांच्या उपस्थितीत काल पूर्ण झालं; त्यानंतर ते बोलत होते.

**जीएसटी**

देशभरात उद्या पासून लागू होत असलेल्या सुधारित जीएसटी दरांच्या पार्श्वभूमीवर ग्राहक व्यवहार विभागाने राष्ट्रीय ग्राहक हेल्पलाइनवर जीएसटी तक्रार निवारण सुविधा सुरू केली आहे. ऑटोमोबाईल, बँकिंग, ग्राहकोपयोगी वस्तू, ई-कॉमर्स, यासारख्या वस्तूंच्या दरांबद्दलच्या तक्रारी यावर नोंदवता येतील. त्यानुसार ग्राहकांना आता पोर्टल किंवा १ ९ १ ५ या टोल-फ्री क्रमांकावर देशातल्या सतरा विविध भाषांमध्ये त्यांच्या तक्रारी नोंदवता येणार आहेत.

**एच-बीव्हिसा**

अमेरिकेच्या एच-१बी व्हिसासंदर्भातील नवीन धोरणाबाबत व्हाईट हाऊसनं स्पष्टीकरण देत सांगितलं आहे की, एक लाख डॉलर्सचं शुल्क हे फक्त नवीन अर्जदारांवर "एकवेळ" आकारलं जाईल. व्हाईट हाऊसच्या प्रवक्त्या कॅरोलिन लेविट यांनी काल हे स्पष्टीकरण दिलं. ज्यांच्याकडं आधीच एच-१बी व्हिसा आहे आणि सध्या देशाबाहेर आहेत त्यांना पुन्हा प्रवेश करण्यासाठी हे शुल्क आकारलं जाणार नाही. तसंच याचा व्हिसा नूतनीकरण किंवा सध्याच्या व्हिसा धारकांवर परिणाम होणार नाही. याशिवाय, या घोषणेचा कोणत्याही व्हिसा धारकाच्या अमेरिकेत जाण्या-येण्याच्या क्षमतेवरही परिणाम होणार नाही, असं लेविट यांनी समाज माध्यमावरील संदेशात सांगितलं आहे. हा आदेश व्हिसा धारक नवीन अर्जदारांना पुढील फेरीपासून लागू केला जाईल.अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शुक्रवारी या एच-१बी व्हिसाबाबतच्या शुल्कासंदर्भातील घोषणेवर स्वाक्षरी केली, ट्रम्प प्रशासनाच्या इमिग्रेशनवरील कारवाई तसंच अमेरिकन नागरिकांसाठी नोकऱ्या निर्माण करण्याच्या कारवाईचा हा एक भाग आहे. गेल्या वर्षी भारत हा एच-१बी व्हिसाचा सर्वात मोठा लाभार्थी होता, यामध्ये मंजूर अर्जांपैकी ७१ टक्के प्रमाण भारतीयांचं होतं तर चीन ११ पूर्णांक ७ टक्क्यानं दुसऱ्या क्रमांकावर होता.

**व्हिसा-भारत**

अमेरिकेच्या एच-१बी व्हिसा अर्जांवर लाखो डॉलर्स शुल्क लादण्याच्या निर्णयाचे परिणाम भारतीय उद्योगांसह सर्व संबंधितांकडून अभ्यासले जात आहेत,असं परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी सांगितलं आहे. भारत आणि अमेरिका या दोन्ही देशातील उद्योगांचा नवोपक्रम आणि सर्जनशीलतेमध्ये सहभाग असून पुढील वाटचालीसाठी सर्वोत्तम मार्गावर विचार विनिमय करण्याची अपेक्षा असून व्हिसासंबंधातील या निर्णयामुळे होणाऱ्या मानवतावादी परिणामांबाबत अमेरिकन अधिकाऱ्यांकडून योग्यरित्या संबोधित केलं जाईल, असंही परराष्ट्र मंत्रालयाच्या निवेदनात सांगण्यात आलं आहे.
भारत आणि अमेरिकेनं तंत्रज्ञान विकास, नवोपक्रम, आर्थिक वाढ, स्पर्धात्मकता आणि संपत्ती निर्मितीमध्ये मोठं योगदान दिलं असून धोरणकर्ते दोन्ही देशांमधील परस्पर संबंधांचा विचार करून या निर्णयाचं मूल्यांकन करतील,असा विश्वास जयस्वाल यांनी व्यक्त केला आहे.

**गोयल**

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल व्यापार करारावरील चर्चेला गती देण्यासाठी उद्या अमेरिकेला जाणाऱ्या शिष्टमंडळाचे नेतृत्व करणार आहेत. उभय देशातील परस्पर फायदेशीर व्यापार करार लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या उद्देशानं चर्चा पुढे नेण्याची या शिष्टमंडळाची योजना असल्याचं

मंत्रालयानं एका निवेदनात म्हटलं आहे.याआधी १६सप्टेंबरला भारतात  आलेल्या अमेरिकेच्या व्यापार प्रतिनिधी कार्यालयातील अधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळानं या व्यापार कराराच्या विविध पैलूंवर सकारात्मक चर्चा केली असून  या संदर्भात प्रयत्न अधिक गतिमान करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचंही मंत्रालयानं  सांगितलं  आहे.

**<u>दादासाहेब फाळके पुरस्कार</u>**

२०२३ या वर्षासाठीचा दादासाहेब फाळके पुरस्कार ज्येष्ठ मल्याळी अभिनेते, दिग्दर्शक आणि निर्माते मोहनलाल यांना प्रदान केला जाणार आहे. माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं समाज माध्यमावरील संदेशात ही माहिती दिली आहे.

परवा २३ तारखेला नवी दिल्लीत होणाऱ्या ७१ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहोळ्यात हा पुरस्कार प्रदान केला जाईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रिय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मोहनलाल यांचं अभिनंदन केलं आहे.

**<u>निधन</u>**

प्रसार भारतीचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी के.एस.शर्मा यांचं काल हैदराबाद इथं निधन झालं.ते ८० वर्षांचे  होते.२००२ ते २००६ पर्यंत त्यांनी प्रसार भारतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून काम केलं.दूरदर्शनचे महासंचालक म्हणूनही त्यांनी काम केलं होतं.दूरदर्शन डायरेक्ट-टू-होम डीटीएच आणि डीडी डायरेक्ट प्लस यासारख्या सेवा सुरू करण्यात त्यांनी मोलाचं  योगदान दिलं  होतं.

**<u>क्रिकेट-पूल,</u>**

भारत आणि ऑस्ट्रेलिया महिला क्रिकेट संघांमधला ५० षटकांचा तिसरा आणि निर्णायक सामना काल ऑस्ट्रेलियानं ४३ धावांनी जिंकला. तीन सामन्यांच्या या मालिकेतही ऑस्ट्रेलियाच्या महिला संघानं २-१ असा विजय मिळवला.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना ऑस्ट्रेलियाच्या महिला संघानं ४८ षटकांत सर्व गडी बाद ४१२ धावा केल्या.  विजयासाठी ४१३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारतीय महिला संघाचे सर्व फलंदाज ३६९ धावांवर बाद झाले.

**<u>आशियाचषक</u>**

आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत आज सुपर फोरमध्ये भारत आणि पाकिस्तान पुन्हा एकदा आमने सामने येणार आहेत. दुबईमध्ये भारतीय प्रमाण वेळेनुसार रात्री ८ वाजता सामना सुरू होईल. या स्पर्धेतल्या पहिल्या सामन्यात भारतानं पाकिस्तानचा सात गडी राखून पराभव केला होता.

**<u>बॅडमिंटन</u>**

चायना मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष दुहेरीच्या अंतिम फेरीत भारताच्या सात्विक साईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीचा सामना आज दक्षिण कोरियाच्या किम वोन हो आणि सेओ सेउंग जे यांच्याशी होणार आहे. सात्विक आणि चिराग यांनी काल उपांत्य फेरीत काल मलेशियाच्या जोडीवर २१-१७, २१-१४ अशी सहज मात केली.

**या बरोबरच ही राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**